# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल :dyracademic@unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/8179

दिनांक : ~~१०~~ 15 सप्टेंबर, २०१४

मा. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था

विषय : महाविद्यालय / संस्थेबाबतची माहिती अद्ययावत करणेबाबत...

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ साठी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषयवाढ, तुकडीवाढ इत्यादींना मंजुरी देण्यासंबंधीचे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया दि. १ ऑक्टोबर, २०१४ पासून सुरू होत आहे.

या पत्राद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, आपण आपल्या महाविद्यालये/ संस्थेबाबतची माहिती उदा. महाविद्यालय/संस्थेमध्ये चालू असणारे व बंद करण्यात आलेले अभ्यासक्रम, कायम संलग्नीकरण घेतलेले अभ्यासक्रम, प्रत्येक अभ्यासक्रमाची अनुदानित व विनाअनुदानित तुकडयांची संख्या इत्यादी जी माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध (upload) केली आहे, ती तपासून त्यामध्ये काही बदल असल्यास ते आपल्या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या login ID मधून करण्यात यावेत. जी माहिती बदलण्याची सुविधा उपलब्ध नाही अशी माहिती विद्यापीठाकडे दुरूस्तीसाठी पाठविण्यात यावी. सदर माहिती महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२ सप्टेंबर, २०१३ नुसार नवीन महाविद्यालये, नवीन विषय/तुकडी/विद्याशाखा/अभ्यासक्रम वाढ तसेच कायम संलग्नीकरण इत्यादींच्या प्रस्तावांची छाननी करणेकरिता आवश्यक असल्याने ती अद्ययावत होणे गरजेचे आहे.

सदर माहिती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने दि. १८ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर, २०१४ या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये मार्गदर्शन करण्याचे/माहिती देण्याचे आयोजन करण्यात आले आहे. आपण बी.सी.यु.डी. ऑनलाईन या संकेतस्थळावर ॲफिलिएशन ऑनलाईन या लिंकद्वारे आपल्या महाविद्यालय/संस्थेच्या लॉगिन आय.डी. मधून लॉगिन करून माहिती अद्ययावत करून घ्यावी. त्यानंतर कॉलेज प्रोफाईल पाहण्याकरिता या लिंकमध्ये उपलब्ध असलेले प्रपत्र डाऊनलोड करून त्याची प्रिंट काढून तपासावी. जी माहिती सुधारित करण्याची सोय महाविद्यालय/संस्थेला दिली नाही त्याची नोंद प्रपत्रावर करून सोबत दिलेल्या यादीनुसार आवश्यक कागदपत्रासोबत कार्यक्रमपत्रिकेत नमूद केलेल्या दिवशी विद्यापीठास सादर करावी. सदर माहिती भरणे सुलभ व्हावे यासाठी यूजर मॅन्युअलची सोय कॉलेज प्रोफाईल पाहण्याकरिता या लिंकमध्ये देण्यात आली आहे.

सदर माहिती, दि. १/१०/२०१४ पासून सुरू होणा-या संलग्निकरणाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रपत्रासोबत आवश्यक कागदपत्रांची यादी व विशेषकरून तपासावयाच्या बाबी.

१. कायमस्वरूपी मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत का ? असल्यास विद्यापीठ मान्यतेचे पत्र.
२. संस्था अल्पसंख्यांक आहे का ? असल्यास शासनाचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
३. महाविद्यालयाचे/संस्थेचे सुरुवातीचे मान्यतेचे पत्र.
४. महाविद्यालयाच्या तालुक्याचे ठिकाण व पिनकोड.
५. महाविद्यालयास युजीसी ॲक्टनुसार २(f) व १२ (b) दर्जा प्राप्त आहे काय ? असल्यास त्याबाबतचे युजीसीचे पत्र.
६. स्वायत्त महाविद्यालय/संस्था आहे काय ? असल्यास स्वायत्तता दिल्याचे पत्र.
७. महाविद्यालय/संस्थेतील मंजूर विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडया व त्यांचे विद्यापीठाचे वेळोवेळी दिलेली मान्यता पत्रे.
८. कायम संलग्नीकरण मिळालेले अभ्यासक्रम / तुकडया व त्यांची विद्यापीठाची मान्यतापत्रे.
९. महाविद्यालये/संस्थेस NAAC/NBA या प्राधिकरणाचे मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन (Accreditation/ Reaccreditation) आहे का ? असल्यास त्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत, तसेच अर्ज केला असल्यास त्याबाबतचा तपशील.

कार्यक्रमपत्रिका

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर (सर्व विद्याशाखा व संशोधन केंद्रे/संस्था) | १८.९.२०१४ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| २. | नाशिक (सर्व विद्याशाखा व संशोधन केंद्रे/संस्था) | १९.९.२०१४ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ३. | पुणे शहर (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र विद्याशाखा व संशोधन केंद्रे/संस्था) | २२.९.२०१४ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ४. | पुणे ग्रामीण व पिंपरी चिंचवड (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र विद्याशाखा व संशोधन केंद्रे/संस्था) | २३.९.२०१४ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ५. | पुणे शहर व ग्रामीण (इंजिनिअरींग, मॅनेजमेंट, आर्किटेक्चर, फार्मसी विद्याशाखा व संशोधन केंद्रे/संस्था) | २४.९.२०१४ | सकाळी ११.०० ते ५.०० |

संचालक
(म.वि.वि.मं.)